**विषयः-** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत. **( शासकीय तंत्रनिकेतन नांदेड येथील माहिती व तंत्रज्ञान इमारत व मुलांचे नविन वस्तीगृह अधिग्रहीत करणेबाबत )**

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१ /कोरोना/सीआर-
दि. ०८/०५/२०२०

वाचाः- १) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे. त्यानुसार मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी मला ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

त्याअर्थी, मी डॉ.विपीन इटनकर (भा.प्र.से) , जिल्हाधिकारी, नांदेड साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम ६५ मधील तरतूदीनूसार मला प्राप्त अधिकारानुसार शासकीय तंत्रनिकेतन नांदेड येथील माहिती व तंत्रज्ञान इमारत व मुलांचे (नविन) वस्तीगृह कोव्हिड-१९ (CCC) कोव्हीड केअर सेंटरसाठी अधिग्रहीत करण्यात येत आहेत.

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी प्राचार्य शासकीय तत्रनिकेतन नांदेड यांच्या समन्वयाने उक्त इमारतीमधील साहित्य व सर्व हॉल रिकामे करुन घेवून प्राचार्य यांचे सल्यानुसार सुरक्षित ठिकाणी तात्काळ हलवावे व सदर ठिकाणी कोव्हीड केअर सेंटरसाठी आवश्यक सर्व व्यवस्था तात्काळ स्थापित करावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी उपविभागीय अधिकारी तथा Incident Commander नांदेड यांनी तात्काळ प्रभावाने अंमलात आणावी.

आणि असेही आदेशित करीत आहे की, जे कोणी व्यक्ती, समुह सदर आदेशाचे उल्लंघन करील, त्यांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये व भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

Scanned with CamScanner

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३. पोलीस अधीक्षक, नांदेड
४. प्राचार्य शासकीय तत्रनिकेतन, नांदेड
५. उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड
६. अधीष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड,
७. अधिष्ठाता, शासकीय आयूर्वेदीक महाविद्यालय, नांदेड
८. जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड
९. जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड
१०. तालूका दंडाधिकारी, नांदेड
११. आरोग्य अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

Scanned with CamScanner